REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 8 | ISSUE - 1 | OCTOBER - 2018

# जागृति वृत्तपत्र आणि सायमन कमिशन

प्रा. सचिन ज्ञानेश्वर मोरे
इतिहास विभाग, अहमदनगर महाविद्यालय, स्टेशन रोड, अहमदनगर.

सत्यशोधकी-ब्राह्मणेतर चळवळीच्या इतिहासात या चळवळीला वाहून घेतलेल्या वृत्तपत्रांनी बजावलेली कामगिरी मोलाची आहे. या पत्रांनी भारतातील सामाजिक सुधारणा चळवळीला आपल्या विचारातून सकारात्मक वळण आणि दिशा दिली. सामाजिक सुधारणा चळवळींची वैचारिक बैठक पक्की करण्याचे मोलाचे काम या पत्रांनी केले. बडोदे येथील भगवंत बळवंत पाळेकर यांनी १९१७ साली काढलेले 'जागृति' हे मराठी भाषेतील साप्ताहिक पत्र १९४९ पर्यंत म्हणजे तब्बल ३२ वर्षे चालले. एका अमराठी प्रांतात इतके वर्षे चाललेले मराठी पत्र म्हणून या पत्राची कामगिरी उल्लेखनीय आहे. या चळवळीतील पत्रांचा मुख्य विषय सामाजिक सुधारणेचा असला तरी 'जागृति' पत्र राजकीय सुधारणेच्या बाबतीत उदासीन नव्हते. हा काळ एकीकडे भारतीय स्वातंत्र्य चळवळीचा; आणि दुसरीकडे भारतीय घटनात्मक वाटचालीचा होता. जागृतिने समकालीन घटनात्मक वाटचालीत आपल्या मताद्वारे त्याला अधिक लोकाभिमुख करण्यासाठी महत्त्वाचे योगदान दिले. या वाटचालीत भारतात विसाव्या शतकात ब्रिटिश सरकारकडून 'सायमन कमिशन'ची केलेली नेमणूक हा महत्त्वाचा टप्पा होता.

१९१९ च्या कौन्सिलच्या सुधारणा कायद्यात त्या कायद्याची योग्य अंमलबजावणीची पाहणी करण्यासाठी दहा वर्षांनी शासकीय समितीची नियुक्ती करण्याची तरतूद होती. ही मुदत संपण्याच्या आधीच सायमन कमिशनची घोषणा झाली. कमिशन लवकर नेमण्यामागे ब्रिटिशांचा सद्हेतू नव्हता. 'इंग्लंडमध्ये १९२९ साली होणाऱ्या निवडणुकीत मजूरपक्ष सत्तेत येण्याची चिन्हे दिसत होती. हा पक्ष भारताबाबत सहानुभूती दाखवणारा असून, सत्तेत आल्यानंतर तो भारताला राजकीय बाबतीत अधिक अधिकार देईल. या भीतीतून ही समिती नेमली होती.'[१]

साहजिकच कमिशनला भारतातील सर्व स्तरातून विरोध झाला. समितीमध्ये एकही भारतीय सदस्य नसणे, हे त्याचे दुसरे कारण होते. भारतात या कमिशनवर बहिष्कार टाकण्यात आला. 'जागृति' पत्राने कमिशनवर बहिष्कार टाकला होता. परंतु या वेळी ब्राह्मणेतर पक्षातील काही लोकांनी कमिशनद्वारे काही अधिकार मिळतील या हेतूने बहिष्काराच्या विरुद्ध मत प्रदर्शित करण्यास सुरूवात केली. त्यांच्यात दोन गट निर्माण झाले. 'वि.रा.शिंदे, जेधेबंधू, बागडे, श्रीपतराव शिंदे, भाऊराव पाटील वगैरे सायमन आयोगाबरोबर सहकार्य करू नये असे म्हणत होते. भास्करराव जाधव, जवळकर, नानासाहेब अमृतकर, रावबहादूर के.एस. नायडू वगैरेंना सायमन आयोगाबरोबर आपण सहकार्य करावे असे वाटत होते...त्यासाठी १९२८ साली जवळकरांनी "कैवारी" पत्र सुरू करून ब्राह्मणेतरांची बाजू मांडण्यास सुरू केले.'[२] जवळकरांनी जेधे यांची साथ सोडल्याने सर्वांना आश्चर्य वाटले. 'जागृति' त्यास अपवाद नव्हती. 'जागृति'ने, "ब्राह्मणेतरांनाच सायमन कमिशनबद्दल इतके प्रेम का वाटावे हे आम्हास समजत नाही. सायमन कमिशनकडून सध्याच्या स्थितीत देशाला काही लभ्यांश होण्याची आशा नाही. एकंदर देशालाच जर काही महत्त्वाचे हक्क मिळाले नाहीत तर एकट्या ब्राह्मणेतरांनाच काय फायदा



होणार आहे?"[३] असा प्रश्न उपस्थितीत करून ब्राह्मणेतरांच्या पक्षात निर्माण होणाऱ्या उतावीळ वृत्तीला विरोध करीत, पक्षाच्या अपूर्ण हितसंबंधापेक्षा राष्ट्रहिताला महत्त्व दिले. "कमिशनपुढे साक्षी देण्यास उतावीळ झालेल्या पुढाऱ्यांचे न ऐकता ब्राह्मणेतर जनतेने बहिष्काराच्या चळवळीलाच पाठिंबा द्यावा, अशी आग्रहाची विनंती आहे."[४] असे आवाहन जागृति पत्राने केले. या आवाहनामागे साम्राज्यवादी धोरणाचा निषेध होता. कमिशनचे स्वागत केले नाही, तर आपणास राजकीय लाभ मिळणार नाहीत. अशी भूमिका काही ब्राह्मणेतर पुढाऱ्यांनी घेतली असता 'पुढाऱ्यांपासून सावध रहा' या लेखात जागृतिने, "कमिशनपुढे आम्ही ब्राह्मणेतर पक्षाचे मत मांडले नाही तर ज्या सुधारणा पुढे अंमलात येतील त्यात ब्राह्मणेतरांच्या वाट्याला काही हक्क येणार नाहीत. या कोटीक्रमाने काही भोळीभाबडी माणसे फसण्याचा संभव आहे. परंतु त्या कोटीक्रमाने घाबरून जाण्याचे कारण नाही असे आम्ही त्यांना आश्वासन देतो."[५] असे मत मांडले. कमिशनच्या बाबतीत जनतेमध्ये ब्राह्मणेतर पुढाऱ्यांनी निर्माण केलेली संभ्रमावस्था खरेतर हास्यास्पद होती. जागृतिने बुद्धिभेदाचा धागा नेमकेपणाने पकडत जनतेला आश्वासित केले. ब्राह्मणेतरांची फसवणूक होत आहे. या प्रचाराची खिल्ली उडवत जागृतिने, "सायमन कमिशन हिंदुस्थानात येत आहे. ते ब्राह्मणेतरांच्या उद्धारासाठी येत आहे असे कोणी धूर्त भासवीत असतील ते भासवोत, आणि कोणी दुधखुळे ते खरे मानीत असतील ते मानोत."[६] असे मत मांडले. जागृतिचे हे मत समकालीन राजकीय आकलनाची व ठाम वैचारिक भूमिकेची पावती होती. "ब्राह्मणेतरांचा समाज राष्ट्रापासून भिन्न नाही. आधी राष्ट्राचा फायदा झाला पाहिजे. मग त्यात ब्राह्मणेतर हिस्सा मागू शकतील आणि त्यांचा वाजवी हिस्सा त्यांच्याकडून हिरावून घेण्याचे कोणालाही सामर्थ्य नाही."[७] जागृतिचे वरील मत, तत्कालीन 'वैचारिक भूमिका' युद्धाच्या पलीकडे जाणारे ठरले. जन्मसिद्ध न्याय्य हक्काचे भान असणाऱ्या जागृतिच्या या मतामध्ये एक-राष्ट्रीयत्वाचे समर्थन करणारी व मूलभूत हक्कांबद्दल सतर्कतेची असलेली जोड दिसून येते.

सायमन कमिशनकडे आशाळभूत नजरेने पाहून वेळोवेळी कमिशनला सहकार्य करण्याची भाषा करणाऱ्या काही ब्राह्मणेतर पुढाऱ्यांना 'ब्राह्मणेतर पक्ष स्वाभिमान दाखविणार की नोकरशाहीची तळी उचलणार?' असा कठोर प्रश्न विचारत जागृतिने, "सायमन कमिशन स्वराज्याचे गाठोडे घेऊन येत नाही. त्याकरिता सुतराम त्या कमिशनची योजना झालेली नाही. हिंदी लोकांवर स्वराज्यविषयक नालायकीचा शेरा मारण्याकरिता, नोकरशाहीचे वर्चस्व कायम ठेवण्याची अवश्यकता प्रतिपादण्याकरिता, आणि हिंदू-मुसलमान, ब्राह्मण-ब्राह्मणेतर, स्पृश्य-अस्पृश्य यांच्यामधील भांडणाचा फायदा घेऊन, कमीतकमी स्वराज्याचे अधिकार देण्याची शिफारस करण्याकरिता सायमन कमिशनची योजना झालेली आहे."[८] असे स्पष्ट मत मांडले. ब्राह्मणेतरांच्या राजकीय आकलनाची व बुद्धीची कीव करीत, जागृतिने ब्रिटिशांच्या 'फोडा आणि राज्य करा' या नीतीचा निषेध केला.

कल्याण येथे ब्राह्मणेतरांनी परिषद भरवून काहीतरी राजकीय हक्क पदरात पडतील या हेतूने सायमन कमिशनला सहकार्य करण्याचा ठराव पास केला. तेव्हा व्यथित होऊन जागृतिने पुढील उद्गार काढले, "ज्या पक्षाला सरकारला कसे व केव्हा आडवावे ते समजत नाही, जो पक्ष स्वाभिमानशून्यता दाखवितो, ज्या पक्षाच्या विरोधाचा केव्हाही संभव वाटत नाही, जो पक्ष केवळ थोड्याशा मानाच्या व लठ्ठ पगाराच्या जागा उपटण्याकरिताच अस्तित्वात आलेला आहे, त्या पक्षाच्या रोषातोशाची सरकारला केव्हाही भीती वाटत नाही. त्या पक्षाचे पुढारी जनतेची स्वार्थासाठी दिशाभूल करून आज न उद्या सरकार प्रसन्न होईल व आपली वर्णी लागेल अशी अपेक्षा करून दिवस कंठीत असतात. परंतु त्यांनी चांगले लक्षात ठेवावे की, सरकार त्यांचा वकूब चांगल्या रीतीने ओळखून आहे."[९] वरील विधान ब्राह्मणेतरांच्या अपूर्ण राजकीय ज्ञानाचे वाभाडे काढणारे व त्यांच्या राष्ट्रीय भूमिकेविषयी शंका व्यक्त करणारे ठरावे. ब्राह्मणेतरांच्या राजकीय आकांक्षा तोकड्या असून, त्या ब्राह्मणांच्या भीतीतून निर्माण झालेल्या आहेत याची जाणीव जागृतिला होती. परंतु, 'राष्ट्रीय भूमिकेला तिलांजली देत, ब्राह्मणांना उगीच महत्त्व देऊन कमिशनकडे आशाळभूत नजरेने पाहणे. ही जागृतिच्या दृष्टीने दुर्दैवाची गोष्ट होती.[१०] सायमन कमिशनकडे पाहण्याची 'जागृति'ची एक स्वतंत्र व व्यापक दृष्टी यावरून लक्षात येते. सायमन कमिशन भारताच्या राजकीय भवितव्याचा विचार करण्यात गुंतले असता भारतातील सर्व महत्त्वाच्या पक्षांनी एकत्र बसून भारतासाठी सर्वसामान्य घटना तयार करण्याची जबाबदारी नेहरूंच्या अध्यक्षतेखाली दिली. जेव्हा दिल्ली येथे भरलेल्या इंडिया

काँग्रेस १९२८ साली नेहरू कमिटीला संमती दिली. त्यावेळी जागृतिने “कमीतकमी वादग्रस्त अशी स्वराज्ययोजना तीच आहे. दुसरी कोणतीही योजना पुढे आली तरी तिला राष्ट्रातील लोकमताची इतकी अनुकुलता मिळणार नाही.”[११] असे म्हणत या योजनेचा पुरस्कार केल्याचे दिसते. “भारतातील भिन्न राजकीय पक्षांनी एकत्र बसून सर्वसंमतीने केलेला भारताच्या भावी घटनेचा हा पहिला व अखरेचा मसुदा होता.”[१२] या योजनेचे जागृतिला चांगले आकलन होते. देशात भिन्न-भिन्न पुढाऱ्यांचा या योजनेला विरोध होता. ब्राह्मणेतरांचे मुखपत्र असले तरी जागृतिने राष्ट्रीय भूमिकेचा पुरस्कार केला.

राजकीय हक्कांना साधन समजणाऱ्या ‘जागृति’च्या राजकीय विचाराच्या मुळाशी ‘समता’ हे तत्त्व होते. तसेच हे राजकीय विचार बहुजनवादी असले तरी त्यामध्ये राष्ट्रैक्याचा व्यापक स्तर होता. ‘सायमन कमिशन’च्या आड दडलेला ब्रिटिश साम्राज्यवादी चेहऱ्याचे आकलन या पत्रास होते. त्यामुळेच अतंर्गत पक्षीय व वैचारिक मतभेदाच्या सीमा ओलांडून जागृति वृत्तपत्राने राष्ट्रहिताचा व राष्ट्रैक्याचा पुरस्कार केल्याचे दिसते.

## संदर्भ आणि टिपा:-

१. सुमन वैद्य, शांत कोठेकर, आधुनिक भारताचा इतिहास १९२१ ते १९४७ , पूर्वोक्त, पृ. २५-२६.
२. य.दि. फडके, विसाव्या शतकातील महाराष्ट्र, खंड तिसरा,१९२१- १९२९, पूर्वोक्त,पृ. २४०.
३. जागृति, ता. ७-१-१९२८.
४. कित्ता.
५. जागृति, ता. २८-१-१९२८.
६. कित्ता.
७. कित्ता.
८. जागृति, ता. १४-७-१९२८.
९. जागृति, ता. २१-७-१९२८.
१०. जागृति, ता. ८-९-१९२८.
११. जागृति, ता. १७-११-१९२८.
१२. सुमन वैद्य, शांत कोठेकर, आधुनिक भारताचा इतिहास १९२१ ते १९४७ , पूर्वोक्त, पृ. ३०.